संं.फौ.ख.क्र.४६/२०२४
सरकार वि. प्रशांत
नि.क्र.११ च्या खाली

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–पो.ना.अमोल बबनराव काळे बक्कल न.२०१३
वय ४३ वर्ष, व्यवसाय–पोलिस हवालदार
राह. पो.ह.बेला,तह.उमरेड जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती विजया जगताप यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

**१.** दि.२१/१०/२०२३ रोजी मी पो.स्टे.बेला अंतर्गत जैतापुर फाटा येथे नाकाबंदीच्या कर्तव्यावर होतो. त्यावेळी गुप्त माहिती मिळाली की, प्रशांत वलके नावाचा इसम हा दारू पिऊ धिंगाना करित आहे. त्यानंतर पोलिस स्टाफ व दोन पंच असे घटनास्थळावर गेलो असता त्या ठिकाणी आरोपी हा दारू पिऊन धिंगाणा करित असल्याचे दिसुन आले. त्यानंतर पंचांना माहिती देऊन पंचांना हजर राहण्याकामी समन्स दिले. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा तयार करून आरोपीला पो.स्टे.ला नेले. त्यानंतर आरोपीवर कारवाई केली. त्यानंतर आरोपीला सरकारी दवाखाण्यात नेऊन त्याच्या रक्ताचा नमुना घेण्यासाठी वैद्यकिय अधिकारी यांना पत्र दिले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.२०** देण्यात आलेला आहे. त्यानंतर आरोपीच्या रक्ताचे नमुने घेतले व त्याचा पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.२१** देण्यात आलेला आहे. तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. श्रीमती एस.जी.रामटेके यांच्यामर्फत उलटतपास शपथेवर सुरू.**

२. मी बेला पो.स्टे.ला २ फेब्रुवारी,२०२२ पासून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांची खोटी बयाणे नोंदविली व खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीचे खोटे वैद्यकिय प्रमाणपत्र व खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२३/०१/२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड